ISSN 2231-1629
Knowledge Resonance
A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal
IMPACT FACTOR 8.072

# पुणे शहरातील स्केटिंग खेळाच्या स्पर्धेच्यादरम्यान उपलब्ध असणाऱ्या सोयी-सुविधांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास

**शोधक : सचिन शिंदे**
**मार्गदर्शक: उज्वला राजे**

***सारांश:***
*प्रस्तुत संशोधनात संशोधकाने पुणे शहरातील स्केटिंग स्पर्धेदरम्यान उपलब्ध असणाऱ्या सोयी सुविधांचा अभ्यास केला आहे. संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट स्केटिंग स्पर्धेदरम्यान कोणकोणत्या सोयी सुविधा खेळाडूंसाठी उपलब्ध असतात. संशोधकाने या संशोधनात वर्णनात्मक पद्धतीतील सर्वेक्षणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी संशोधकाने पुणे शहरातील स्केटिंग या खेळाच्या खेळाडूंच्या १५० पालकांना प्रश्नावली दिल्या व पालकांनी प्रश्नावलीस दिलेल्या प्रतिसादा वरून माहिती संकलित केली. संशोधकाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी पुढील प्रमाणे पर्याय दिले होते. (उपलब्ध असतात, कधीकधी उपलब्ध असतात, उपलब्ध नसतात, नेहमीच उपलब्ध नसतात व इतर) असे पाच प्रतिसाद दिले होते. पुणे शहरातील स्पर्धेदरम्यान उपलब्ध असणाऱ्या सोयीसुविधा याबाबत असलेली प्रश्नावली १५० पालकांना देण्यात आली व त्यातील ७० पालकांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिला या प्रश्नावली व्दारे मिळालेल्या माहितीचे संकलन करून आलेल्या माहितीची वारंवारता काढून त्याचे अर्थनिर्वचन केले. त्यावरून असे लक्षात आले की पुणे शहरातील स्केटिंग स्पर्धेच्या दरम्यान स्पर्धा घेणे योग्य मैदाने, खेळाडूंना चेंजिंग रूम, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, बसण्याची सोय व प्रथमोपचाराची सोय यातील काही सोयी–सुविधा ह्या नेहमी उपलब्ध असतात, स्पर्धे दरम्यान काही सोयी–सुविधा कधी कधी उपलब्ध असतात, त्याच प्रमाणे काही सोयी–सुविधा नसतात, तर काही सोयी–सुविधा नेहमीच उपलब्ध नसतात, असे निदर्शनास आले.*

***महत्त्वाचे शब्द :*** *पालक, स्केटिंगचे खेळाडू, स्केटिंग स्पर्धे, सोयी–सुविधा, स्केटिंगचे मैदान, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, बसण्याची सोय, प्रथमोपचाराची*

**प्रस्तावना :** स्केटिंग खेळ स्केटिंग हा खेळ सर्व गटातील विद्यार्थ्यांना आकर्षित करणार आहे. प्रत्येक व्यक्तीस आपण नवीन काही साहसी खेळ खेळावा असे वाटते. विद्यार्थ्यांना नवीन साहस करणे व नवीन गोष्टी शिकणे याकडे त्यांचा जास्त कल असतो. त्याच प्रमाणे स्केटिंग हा साहसी खेळ म्हणून ओळखला जातो. या खेळाला स्पर्धात्मक रूप प्राप्त झालेले आहे. या खेळामध्ये अनेक खेळाडू भाग घेत असतात. या खेळाच्या होणाऱ्या स्पर्धेदरम्यान खेळाडूंना कोणकोणत्या सोयी-सुविधा उपलब्ध असतात यासंदर्भात संशोधकाने अभ्यास करणे गरजेचे वाटले. स्केटिंग ची स्पर्धा घेणे योग्य मैदान उपलब्ध आहेत का? स्केटिंग या खेळाची स्पर्धा घेण्यायोग्य मैदान उपलब्ध असतील तर खेळाडूना इजा होणार नाहीत व त्यांना या मैदानावर झालेल्या स्पर्धेचे उपयोग त्यांच्या पुढील स्केटिंग या खेळाच्या राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय या उच्च स्तरावरील स्पर्धेमध्ये होईल. त्याचप्रमाणे खेळाडूंना चेंजिंग रूम उपलब्ध असतात का? जर खेळाडूंना चेंजिंग रूम स्पर्धेदरम्यान उपलब्ध असतील तर त्यांना त्वरित खेळासाठी तयार होऊन मैदानावर जाता येईल. खेळाडूंना स्केटिंग खेळाचा ड्रेस दिवसभर घालून थांबावे लागणार नाही. स्वच्छतागृह ही प्रत्येक स्पर्धेच्या दरम्यान महत्त्वाची बाब ठरली जाते. त्यामुळे स्वच्छतागृह उपलब्ध असतात का यासंदर्भात संशोधकाने विचारले होते. पिण्याचे पाणी ही मूलभूत गरज आहे. खेळाडूंना व पालकांना स्पर्धेच्या ठिकाणी पिण्याचे पाणी उपलब्ध असेल तर त्यांची गैरसोय होणार नाही. स्पर्धेच्या ठिकाणी बसण्यासाठी सोय उपलब्ध असतात का? जेणेकरून खेळाडू व पालकांना स्पर्धे बसून पाहता येतील. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे प्रत्येक स्पर्धेदरम्यान प्रथमोपचार सोय उपलब्ध असते का? जर कोणत्या खेळाडूला काही इजा झाली असेल तर प्रथमोपचार याची सोय स्पर्धेदरम्यान असावी. या सुविधांच्या

अभावामुळे खेळाडू व त्याच्या पालकांची गैर सोय होणार नाही. या सोयी–सुविधा उपलब्ध असतात का? हे प्रस्तुत संशोधनात संशोधकाने तपासण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनामध्ये विश्लेशणात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षणात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

**प्रतीसादक:** संशोधनात संशोधकाने निवडलेल्या पुणे शहरातील स्केटिंगया खेळाचे प्रशिक्षण देणाऱ्या ३० स्केटिंग क्लबमधील स्केटिंग हा खेळा खेळणाऱ्या खेळाडूंचे पालक ही या संशोधनाची जनसंख्या होती. तर पुणे शहरतील स्केटिंग या खेळाचे प्रशिक्षण देणाऱ्या ३० स्केटिंग क्लब मधील स्केटिंग खेळाडूंच्या १५० पालकांची निवड सहेतूक न्यादर्श पद्धतीने केली.

**संख्याशास्त्रीय साधने:** सदर संशोधनात संशोधकाने वारंवारिता या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केला आहे.

**माहितीचे विश्लेषण:**

**कोष्टक क्र. १**

स्केटिंग स्पर्धा घेण्यायोग्य उपलब्ध मैदानीची वारंवारिता विश्लेषण

प्रश्न: स्केटिंगची स्पर्धा घेण्यायोग्य मैदान उपलब्ध असतात का?

| प्रश्नाचे उत्तर | वारंवारिता |
|---|---|
| उपलब्ध असतात | ५५ |
| कधी कधी उपलब्ध असतात | ११ |
| उपलब्ध नसतात | ३ |
| नेहमीच उपलब्ध नसतात | १ |
| **एकूण प्रतिसाद** | **७०** |

स्केटिंग स्पर्धा घेण्यायोग्य उपलब्ध असणाऱ्या मैदानीचे वर्णनात्मक संख्याशास्त्रीय विश्लेषणाचे अर्थनिर्वचन केले आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने स्केटिंगची स्पर्धा घेण्यायोग्य मैदान उपलब्ध असतात का? असे विचारले असता स्केटिंग खेळातील खेळाडूंच्या पालकांनकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कोष्टक क्रमांक १ मध्ये दिलेला आहे. स्केटिंगची स्पर्धा घेण्यायोग्य मैदान उपलब्ध असतात का? या संदर्भात विचारले असता ७० प्रतिसाद पैकी ५५ पालकांनी स्केटिंग या खेळाची स्पर्धा घेण्यायोग्य मैदान उपलब्ध असतात. असे उत्तर दिले आहे, तर ११ पालकांनी स्केटिंग या खेळाची स्पर्धा घेण्यायोग्य मैदान कधी कधी उपलब्ध असतात असे उत्तर दिले आहे, त्याच्या पैकी ३ पालकांनी स्केटिंग या खेळाची स्पर्धा घेण्यायोग्य मैदान उपलब्ध नसतात असे उत्तर दिले आहे, तर एका पालकांनी स्केटिंग या खेळाची स्पर्धा घेण्यायोग्य मैदान नेहमीच उपलब्ध नसतात याप्रमाणे प्रतिसाद नोंदवले आहेत.

**कोष्टक क्र. २**

स्केटिंग स्पर्धे उपलब्ध असलेल्या चेंजिंग रुमचे वारंवारिता विश्लेषण

प्रश्न: स्केटिंगच्या स्पर्धा दरम्यान खेळाडूना चेंजिंग रुम उपलब्ध असतात का?

| प्रश्नाचे उत्तर | वारंवारिता |
|---|---|
| उपलब्ध असतात | २४ |
| कधी कधी उपलब्ध असतात | २६ |
| उपलब्ध नसतात | ११ |
| नेहमीच उपलब्ध नसतात | ९ |
| **एकूण प्रतिसाद** | **७०** |

स्केटिंग स्पर्धे उपलब्ध असलेल्या चेंजिंग रुमचे वर्णनात्मक संख्याशास्त्रीय वारंवारिताचे अर्थनिर्वचन केले आहे. सादर संशोधनात पुणे शहरातील स्केटिंगच्या स्पर्धा दरम्यान खेळाडूना चेंजिंग रुम उपलब्ध असतात का? असे विचारले असता स्केटिंग खेळातील खेळाडूंच्या पालकांनकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कोष्टक क्रमांक २४ मध्ये दिलेला आहे . या संदर्भात विचारले असता २ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धा दरम्यान खेळाडूना चेंजिंग रुम उपलब्ध असतात. असे उत्तर दिले आहे, तर ७० प्रतिसादा पैकी सर्वात जास्त २६ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धा दरम्यान खेळाडूना चेंजिंग रुम कधी कधी उपलब्ध असतात असे उत्तर दिले आहे, त्याच्या पैकी ११ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धा दरम्यान खेळाडूना चेंजिंग रुम उपलब्ध नसतात असे उत्तर दिले आहे, तर ९ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धा

दरम्यान खेळाडूना चेंजिंग रुम नेहमीच उपलब्ध नसतात असा याप्रमाणे प्रतिसाद नोंदवले आहेत.

**कोष्टक क्र. ३**

स्केटिंग स्पर्धेच्या टिकाणी उपलब्ध असलेल्या स्वच्छाता गृहची वारंवारिता विश्लेषण

प्रश्न: स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी स्वच्छाता गृह उपलब्ध असतात का?

| **प्रश्नाचे उत्तर** | **वारंवारिता** |
|---|---|
| उपलब्ध असतात | ४७ |
| कधी कधी उपलब्ध असतात | १७ |
| उपलब्ध नसतात | ३ |
| नेहमीच उपलब्ध नसतात | ३ |
| **एकूण प्रतिसाद** | **७०** |

स्केटिंग स्पर्धेच्या टिकाणी उपलब्ध असलेल्या स्वच्छाता गृहचे वर्णनात्मक संख्याशास्त्रीय वारंवारिताचे अर्थनिर्वचन केले आहे. सादर संशोधनात पुणे शहरातील स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी स्वच्छाता गृह उपलब्ध असतात का? असे विचारले असता स्केटिंग खेळातील खेळाडूंच्या पालकांनकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कोष्टक क्रमांक ३ मध्ये दिलेला आहे. या संदर्भात विचारले असता ७० प्रतिसादा पैकी सर्वात जास्त ४७ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धा दरम्यान खेळाडूना स्वच्छाता गृह उपलब्ध असतात असे सांगितले. तर १७ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी स्वच्छाता गृह कधी कधी उपलब्ध असतात. असे उत्तर दिले आहे, तर ३ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी स्वच्छाता गृह उपलब्ध नसतात असे उत्तर दिले आहे, ३ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी स्वच्छाता गृह नेहमीच उपलब्ध नसतात याप्रमाणे प्रतिसाद नोंदवले आहेत.

कोष्टक क्र. ४

स्पर्धच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची उपलब्धतेचे वारंवारिता विश्लेषण

प्रश्न : स्केटिंगच्या स्पर्धेच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असतात का?

| **प्रश्नाचे उत्तर** | **वारंवारिता** |
|---|---|
| उपलब्ध असतात | ४५ |
| कधी कधी उपलब्ध असतात | १८ |
| उपलब्ध नसतात | ५ |
| नेहमीच उपलब्ध नसतात | २ |
| **एकूण प्रतिसाद** | **७०** |

स्पर्धेच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची उपलब्धतेचे वर्णनात्मक संख्याशास्त्रीय वारंवारितेचे अर्थनिर्वचन केले आहे. सादर संशोधनात पुणे शहरातील स्केटिंगच्या स्पर्धेच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असतात का ? असे विचारले असता प्रशिक्षकांन कडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कोष्टक क्रमांक ४ मध्ये दिलेला आहे. स्केटिंगच्या स्पर्धेच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असतात का? या संदर्भात विचारले असता २८ प्रशिक्षकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असतात. असे उत्तर दिले आहे, तर २ प्रशिक्षकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय कधी कधी उपलब्ध असतात असे उत्तर दिले आहे, याप्रमाणे प्रतिसाद नोंदवले आहेत.

**कोष्टक क्र. ५**

स्पर्धेच्या ठिकाणी बसण्यासाठी असणाऱ्या सोयीचे वारंवारिता विश्लेषण

प्रश्न : स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी बसण्यासाठी सोय उपलब्ध असतात का?

| **प्रश्नाचे उत्तर** | **वारंवारिता** |
|---|---|
| उपलब्ध असतात | ४८ |
| कधी कधी उपलब्ध असतात | १३ |
| उपलब्ध नसतात | ६ |
| नेहमीच उपलब्ध नसतात | ३ |
| **एकूण प्रतिसाद** | **७०** |

स्पर्धेच्या ठिकाणी बसण्यासाठी असणाऱ्या सोयीचे वर्णनात्मक संख्याशास्त्रीय वारंवारितेचे अर्थनिर्वचन

केले आहे. सादर संशोधनात पुणे शहरातील स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी बसण्यासाठी सोय उपलब्ध असतात का? असे विचारले असता पलाकांन कडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कोष्टक क्रमांक ५ मध्ये दिलेला आहे. स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी बसण्यासाठी सोय उपलब्ध असतात का? या संदर्भात विचारले असता ४८ पलाकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी बसण्यासाठी सोय उपलब्ध असतात. असे उत्तर दिले आहे, तर १३ पलाकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी बसण्यासाठी सोय कधी कधी उपलब्ध असतात असे उत्तर दिले आहे. त्याच्या पैकी ६ पलाकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी बसण्यासाठी सोय उपलब्ध नसतात असे उत्तर दिले आहे, तर ३ पलाकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी बसण्यासाठी सोय नेहमीच उपलब्ध नसते याप्रमाणे प्रतिसाद नोंदवला आहे.

**कोष्टक क्र. ६**

स्पर्धेच्या ठिकाणी उपलब्ध असणऱ्या प्रथमोपचारची सोयच्या वारंवारितेचे विश्लेषण

प्रश्न : स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी प्रथमोपचारची सोय उपलब्ध असते का?

| प्रश्नाचे उत्तर | वारंवारिता |
|---|---|
| उपलब्ध असतात | ५६ |
| कधी कधी उपलब्ध असतात | ८ |
| उपलब्ध नसतात | ५ |
| नेहमीच उपलब्ध नसतात | १ |
| **एकूण प्रतिसाद** | **७०** |

स्पर्धेच्या ठिकाणी उपलब्ध असणऱ्या प्रथमोपचारची सोयचे वर्णनात्मक संख्याशास्त्रीय वारंवारितेचे अर्थ निर्वचन केले आहे. सादर संशोधनात पुणे शहरातील स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी प्रथमोपचारची सोय उपलब्ध असते का? असे विचारले असता पालकांन कडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कोष्टक क्रमांक ६ मध्ये दिलेला आहे. स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी प्रथमोपचारची सोय उपलब्ध असते का? या संदर्भात विचारले असता ५६ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी प्रथमोपचारची सोय उपलब्ध असतात. असे उत्तर दिले आहे, तर ८ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी प्रथमोपचारची सोय कधी कधी उपलब्ध असतात असे उत्तर दिले आहे, तर ५ पालकांनी स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी प्रथमोपचारची सोय उपलब्ध नसते. तर एका पालकाने स्केटिंगच्या स्पर्धाच्या ठिकाणी प्रथमोपचारची सोय नेहमीच उपलब्ध याप्रमाणे नसते प्रतिसाद नोंदवले आहेत.

**निष्कर्ष :**

पुणे शहरतील स्केटिंग या खेळाची स्पर्धा घेण्यायोग्य मैदन उपलब्ध असतात.

पुणे शहरतील स्केटिंग या खेळाच्या स्पर्धेच्या ठिकाणी खेळाडूना चेंजिंग रूम उपलब्ध असतात.

पुणे शहरतील स्केटिंग या खेळाच्या स्पर्धेच्या ठिकाणी खेळाडूना व पालकांना स्वच्छाता गृह उपलब्ध असतात.

पुणे शहरतील स्केटिंग या खेळाच्या स्पर्धेच्या ठिकाणी खेळाडूना व पालकांना बसण्यासाठी सोय उपलब्ध असते.

पुणे शहरतील स्केटिंग या खेळाच्या स्पर्धेच्या ठिकाणी प्रथमोपचारची सोय खेळाडूना उपलब्ध असते.

**शिफारशी**

या खेळा व्यतिरिक्त दुसऱ्या खेळात प्रशिक्षणा दरम्यान सोयी-सुविधा उपलब्ध असतात याचा अभ्यास करता येईल.

स्केटिंग खेळा व्यतिरिक्त खेळाडूना स्पर्धे दरम्यान कोणकोणत्या सोयी-सुविधा उपलब्ध असतात याचा अभ्यास करता येईल.

या खेळा व्यतिरिक्त इतर खेळाचे प्रशिक्षणासाठी कोणकोणत्या प्रकारच्या क्रीडांगणाचा वापर केला जातो याचा .अभ्यास करता येईल.

या खेळा व्यतिरिक्त इतर खेळामध्ये प्रशिक्षणासाठी कोणकोणत्या प्रकारच्या साधनांचा वापर केला जातो.

## संदर्भ सूची

1. *मुळे, श. आणि उमाठे, वि. तु. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (३री.आवृत्ती). नागपूर: महाराष्ट्रविद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.*
2. *बेस्ट,जे., आणि खान, जे.(२००३). रिर्सच इन फिजिकल एजुकेशन (९वी.आवृत्ती).नवी दिल्ली: प्रिंटींग ऑल इंडिया पी.व्ही.टी.*

3. *कुमार,रणजित.,(२०१७).संशोधनपद्धती. नवी दिल्ली: सेगा पुब्लीकेशन.*
4. *कांगणे, स. आहेर, श. आणि महाडिक, श्री.(२०१४) शरीरिक शिक्षण (२री.आवृत्ती). पुणे: निराली प्रकाशन*
5. *खळे, नि. (२०१२). शालेय विद्यर्थ्याच्या शारीरिक सुदृढता व शारीरिक सुदृढतेचा स्व-अवबोधाचा विश्लेषणात्मक अभ्यास. (अप्रकाशीत एम. पी. एड. शारीरिक शिक्षण पदवी पूर्ततेसाठी पुणे विद्यापीठास सादर केलेला प्रबंध) चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्याल, गुलटेकडी, पुणे.*
6. *चौधरी, श. (२०१६). चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महविद्यालयातील शारीरिक शिक्षण पाठादरम्यान उपयोगात येणाऱ्या आयेजन तंत्राच्या परीणामकारतेचा विश्लेषणात्मक अभ्यास. (अप्रकाशीत एम. पी. एड. शारीरिक शिक्षण पदवी पूर्ततेसाठी पुणे विद्यापीठास सादर केलेला प्रबंध) चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्याल, गुलटेकडी, पुणे.*